# ई-निविदा सुचना

## पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर.

### विविध प्रकारचे मल्टीफक्शनल प्रिंटर साहित्याचा व टोनरचा वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरार

क्र. पोआना/भापा/मल्टीफक्शनल प्रिंटर साहित्य व टोनरचा/दरकारार/ 6040/२०२६ नागपूर शहर. दि. 15/05/26

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे, सर्व कार्यालय, सर्व वाहतुक परिमंडळ, सर्व परिमंडळ, सर्व शाखा, सर्व विभाग, उत्तर/दक्षिण विभाग, गुन्हे शाखा/ आर्थीक गुन्हे शाखा, बिनतारी संदेश, विशेष शाखा, मोटार परिवहन विभाग येथील दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरीता मल्टीफक्शनल कंपनीचे प्रिंटर या कार्यालयामार्फत पुरविण्यात आलेले असुन त्यांचा वार्षीक देखभाल दुरुस्ती व टोनर/रीफींलींग सेवाकरार करणेकरीता पुरवठादार यांचेकडुन ई-निविदा (Technical Bid/Price Bid) मागविण्यात येत आहे. ई-निविदाचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध आहे.

| Sr. No. | List of Items | Tender Value | Tender Fee | EMD |
|---|---|---|---|---|
| १ | विविध प्रकारचे मल्टीफक्शनल प्रिंटर साहित्य दुरुस्ती व टोनर/रीफींलीग | १५,००,०००/- | ५,७००/- | ९५,०००/- |

१) निविदा ऑनलाईन उपलब्ध दिनांक — दि.१८/०५/२०२६ चे ११:००वा. पासुन
ते
दि.२९/०५/२०२६ चे १६:००वा. पर्यंत.

२) निविदा पूर्व बैठक — दि.२२/०५/२०२६ चे १६:००वा.

३) ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक — दि. ०१/०६/२०२६ चे १२:००वा.

( दिपक अग्रवाल )
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय
नागपूर शहर.

# पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर.

सुचना क्र पोआना/भांपा/मल्टीफक्शनल प्रिंटर/दरकरार/निविदा/6040/२०२६ नागपूर दि. 15/05/26

त्यामध्ये खालील अटी व शर्थीचा समावेश राहिल.

१) सदर निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व निविदाधारक यांनी या निविदा प्रक्रियेची संपुर्ण कार्यवाही Online करावी.

२) निविदा ऑनलाईन, व्दि-लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत असुन त्या करीता लिफाफा क्र १ (तांत्रिक) मध्ये निविदा अर्ज, अटी व शर्ती पुर्ण भरलेल्या निविदा धारकाच्या स्वाक्षरीसह निविदा अर्जामधील नमुद अ.क्र. २ ते ११ नुसार मागबिण्यात आलेले संपुर्ण कागदपत्रे निविदा धारकाच्या साक्षांकीत प्रतीसह निविदा भरणा तारखेच्या अंतीम तारखेपुर्वीचे असणे आवश्यक आहे.

३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे, शाखा/ विभाग, कार्यालय, येथील दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरीता विविध कंपनीचे मल्टीफक्शनल प्रिंटर व टोनर/रीफींलींग यांचा वार्षीक देखभाल, दुरुस्ती व सेवाकरार करणेकरीता निविदा फी व अनामत रक्कम Online जमा करावी लागेल. तसेच ज्या फर्मची निविदा मंजुर होईल त्यांना सुरक्षा ठेव म्हणुन ०३ टक्के रक्कम PA to Commissioner of Police. Nagpur City यांचे नावे DD/Bank Gurantee/ FDR स्वरुपात जमा करावी लागेल.

४) निविदा अर्जामध्ये नमुद प्रमाणे मागविण्यात आलेली कागदपत्रे सादर न केल्यास तसेच अपुर्ण कागदपत्रे असणाऱ्या संदि निविदा स्विकारल्या जाणार नाही.

५) सदरहु वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरार हा २४ तास सेवा करणाऱ्या पोलीस विभागाचा असल्याने पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सर्व ठाणे, शाखा, विभाग, कार्यालयास आवश्यकता भासेल त्यावेळी २४ x ७ सेवा देणे बंधनकारक राहील.

६) सदरहु वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरार सर्व समावेशक (Non-Comprehensive) पध्दतीचा असल्याने नादुरुस्त मल्टीफक्शनल प्रिंटर व टोनर/रीफींलींग करीता लागणारे सुटे भाग रु.५,०००/- चे वर असल्यास त्याकरीता या कार्यालयाची मंजुरी प्राप्त झल्यानंतर दुरुस्तीची कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येईल.

७) वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरारामध्ये असणाऱ्या सर्व मल्टीफक्शनल प्रिंटरची संपुर्ण वर्षात किमान ०३ वेळा सर्व्हीसींग करण्यात यावी.

८) मल्टीफक्शनल प्रिंटरमध्ये बिघाड झाल्यास त्याची २४ तासाचे आंत दुरुस्ती करुन कार्यान्वीत करुन देण्यात यावे. तसेच आवश्यकता भासल्यास एका कार्यालयामधुन दुसऱ्या कार्यालयामध्ये अथवा एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरण करुन देणे बंधनकारक राहिल. स्थानांतरणाचा खर्च सेवाकरारदार यांना सोसावा लागेल.

९) सदरहु वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरार सर्वसमावेशक (Non-Comprehensive) पध्दतीचा असल्याने टोनर काट्रेजचे दर स्वतंत्ररित्या दर्शविणेबाबत कळविण्यात येईल.

१०) मल्टीफक्शनल प्रिंटर वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरारचे देयक दर ०३ महिन्यांनी या कार्यालयास मंजुरीस्तव सादर करणेबाबत कळविण्यात येईल.

११) कार्यालयीन आदेशानुसादर योग्यवेळी/आवश्यक असेल त्यावेळी सेवा न पुरविल्यास, नादुरुस्त साहित्याची देखभाल दुरुस्ती कोणत्याही संस्थेकडुन करुन घेण्यात येईल, आणि त्यांचा संपुर्ण अधिभार मंजुर निविदाधारकावर राहिल, तसेच त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१२) प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची अथवा कोणतीहि निविदा संपूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा नाकारणे या बाबतचा अधिकार पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी राखुन ठेवला आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे अथवा स्पष्टीकरण देणे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना बंधनकारक असणार नाही.

१३) वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकराराचा कालावधी कार्यादेश दिल्याचे तारखेपासुन एक वर्षांकरीता अथवा नविन वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरार होईपर्यंत, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या निर्णयानुसार राहील.

१४) निविदेत कमी दर नमुद करणारे सेवापुरवठादार चांगल्या प्रकारची सेवा देतीलच असे नाही. हि बाब लक्षात घेता सेवेचा दर्जा विचारात घेवुन तसेच त्यांचे मागील कामाचा अनुभव आणि दरामधील तफावत यानुसादर देखभाल, दुरुस्ती सेवाकरार करण्यात येईल.

१५) वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकराराची देयके, अनुदाना अभावी प्रलंबीत राहीलयास सेवा खंडीत किंवा बंद करता येणार नाही.

१६) देयके मंजुरीच्या वेळी आयकर विभागाचे नियमानुसादर TDS/GST कपात करण्यात येईल.

१७) सेवाधारक यांची सेवा समाधानकारक न राहील्यास त्यांचे असमाधानकारक कार्यामुळे नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.

१८) तांत्रिक बीडच्या मुळ कागदपत्राची तपासणी कमेटीचे समक्ष करण्यात येईल. तसेच कागदपत्रानुसार पात्र/अपात्र ठरविण्याचे अधिकार पोलीस आयुक्त, नागपूर शहर. यांनी राखुन ठेवलेले आहे.

१९) निविदा मंजुर झाल्यावर ३ दिवसात नियमानुसार अनामत रक्कम भरुन करारनामा करावा लागेल.

२०) विविध कंपनीचे मल्टीफक्शनल प्रिंटर व टोनर/रीफींलींग यांकरीता काही सुटे भागांची आवश्यकता भासल्यास सदरचे सुटे भाग उच्च प्रतीचे लावणे बंधनकारक राहील.

२१) हयाउपर कोणतीही अडचण उदभवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर. यांना राहील.

२२) कोणताही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास ते नागूपर शहरातील न्यायालयात सोडविता येईल.

( दिपक अग्रवाल )
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय
नागपूर शहर.

उपरोक्त ०१ ते २१ अटी व शर्ती मी काळजीपुर्वक वाचल्या असुन समजुन घेतल्या आहेत. सदर सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यांचे तंतोतंत पालन करण्याची हमी देत आहेत.

ठिकाण :-

दिंनाक :-

निविदाधारकाचे नाव सही व शिक्का.

# पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर.
## निविदा अर्ज (तांत्रिक बीड)

प्रति,

मा. पोलीस आयुक्त,
नागपूर शहर.

विषय :- नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील विविध प्रकारचे मल्टीफक्शनल प्रिंटर साहित्याचा व टोनर/रीफींलींग वार्षीक देखभाल दुरुस्ती सेवाकरार करणेकरीता (Technical Bid)

------००------

महोदय,

मी श्री / मेसर्स ------------------------------------------------- संदर्भीय जाहिरातीच्या अनुषंगाने तयार केलेला ई-निविदा अर्ज वाचला असुन त्यात सादर केलेल्या अटी व शर्तीशी पुर्णपणे सहमत आहे. करीता नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे, सर्व कार्यालय, सर्व वाहतुक परिमंडळ, सर्व शाखा, सर्व विभाग, उत्तर/दक्षिण विभाग, गुन्हे शाखा/ आर्थीक गुन्हे शाखा, बिनतारी संदेश, विशेष शाखा, मोटार परिवहन विभाग येथील दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरीता विविध कंपनीचे मल्टीफक्शनल प्रिंटर व टोनर/रीफींलींग यांचा वार्षीक देखभाल, दुरुस्ती व सेवाकरार करणेकरीता तयार असल्याबाबत याव्दारे हमी देत आहे.

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्रे | प्रात्र / अप्रात्र |
|---|---|---|
| १ | फर्मचे नांव व संपुर्ण पत्ता, (फोन नं सह) | |
| २ | फर्म नोंदणी प्रमाणपत्र | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ३ | PAN No | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ४ | इनकम टॅक्स क्लिअरन्स प्रमाणपत्र (मागील ०३ वर्षाचे) | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ५ | जीएसटी नंबर / जीएसटी नांदणी प्रमाणपत्र | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ६ | जीएसटी भरणा चालान ( मागील ०६ महिण्याचे) | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ७ | आयएसओ (ISO) प्रमाणपत्र | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ८ | व्यावसाय कर (PT) प्रमाणपत्र (मागिल वर्षाचे) | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ९ | अनुभव प्रमाणपत्र (मागील ०३ वर्षाचे) | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| १० | अनामत रक्कम भरणा करण्यापासुन सुट मिळणबाबतचे प्रमाणपत्र | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| ११ | शासकिय कार्यालयाचे अभिलेखात काळया यादीमध्ये (Block Listed) नसलेबाबत प्रमाणपत्र | जोडले आहे / नाही पान क्र. ------- |
| | | |

निविदा धारकाचे नाव :-

स्वाक्षरी (दिनांका सह) :-

संस्थेचा शिक्का :-

Signature Not Verified

Digitally signed by VIJAY NANDLAL HARNE
Date: 2026.05.18 14:31:05 IST
Location: Maharashtra-MH